महाराष्ट्रातील क्र. २ चा वृत्तपत्र समूह

# पुण्य नगरी

पुणे, गुरुवार,११ सप्टेंबर २०१४

किंमत ४ रुपये

www.epunyanagari.com | वर्ष : १५ | अंक : ३०० | पाने १६+८=२४ | मुंबई | ठाणे | पुणे | नाशिक | कोल्हापूर | सोलापूर | औरंगाबाद | जळगाव | अकोला | नागपूर येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे महाराष्ट्रातील प्रचंड खपाचे दैनिक

**पुण्यात आजपासून दोनवेळा पाणीपुरवठा**

**'तोरण बंदी' कायम**

▸▸ पान ७ वर....

**आठव्या मजल्यावरून उडी मारून अभियंत्याची आत्महत्या**

▸▸ पान ८ वर....

**पुणे महापौरपदासाठी राष्ट्रवादीच्या धनकवडे यांचा अर्ज दाखल**

▸▸ पान २ वर....

**ठाणे महापौरपदी शिवसेनेचे संजय मोरे**

▸▸ पान ४ वर....

इम्पलान्टस् | क्राऊनस् | ब्रिजेस् ने
आपले नसलेले दात परत मिळवा
मोफत चेक-अप आणि एक्स-रे
020-60708491




mydentist
smile more • pay less
India's largest chain of dental clinics
आता आम्ही बाणेर रोड आणि पुणे युनवर्सिटी सर्कल मध्ये
१५ क्लिनिक्स् | मुंबई, पुणे आणि सुरत | सोम ते शनि - ९ ते ९ | www.mydentist.co.in
• आपटे रोड • औंध • बाणेर रोड • कोरेगाव पार्क • कोथरूड • नळ स्टॉप • पिंपळे सौदागर • नवीपेठ • पुणे युनवर्सिटी सर्कल / एस. बी. रोड • टिळक रोड • बिबवेवाडी • कॅम्प / एम. जी. रोड • कोंधवा • बावधान • चिंचवड • विमान नगर

# आघाडी मारणार सत्तेचा चौकार!

## चौथ्यांदाही सत्तेवर येऊ : मुख्यमंत्री ▌ चार अपक्ष आमदार काँग्रेसमध्ये दाखल

**मुंबई : लोकसभा निवडणुकांच्या वेळी अनपेक्षित निकाल लागले. पण जनतेच्या लक्षात आता आपली चूक आली आहे. जनतेला आता ठोकशाही नको, लोकशाही हवी आहे. त्यामुळे नियोजनबद्ध प्रचार करून चौथ्यांदा राज्यात आम्हीच पुन्हा सत्तेवर येऊ, असा विश्वास मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी बुधवारी व्यक्त केला. त्याचवेळी राष्ट्रवादी काँग्रेसने आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करावा. त्यांच्यासाठी हीच योग्य वेळ आहे, अशी टिप्पणी वनमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी केली. मात्र, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यांनी पतंगरावांचे हे मत वैयक्तिक असल्याचे सांगत विषयावर पडदा टाकला.**



परतूरचे सुरेश जेथलिया, नायगावचे वसंत चव्हाण, जळगावचे शिरीष चौधरी आणि माणचे आमदार अजयकुमार गोरे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीला पूर्ण कार्यकाल पाठिंबा देणारे अपक्ष आमदार सुरेश जेथलिया, शिरीष चौधरी, जयकुमार गोरे आणि वसंत चव्हाण या चौघांनी आज काँग्रेस पक्षात अधिकृतरीत्या प्रवेश केला. त्यावेळी ते बोलत होते. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे यावेळी उपस्थत होते. परतूरचे (जालना) आमदार सुरेश जेथलिया, नायगावचे (नांदेड) वसंत चव्हाण आणि जळगाव जिल्ह्यातील चिरंजीव शिरीष चौधरी तसेच माणचे आमदार जयकुमार गोरे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांना यावेळी विधानसभेसाठी उमेदवारी दिली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाहीर केले. पूर्वीपेक्षा जास्त मताधिक्याने यावेळी ते निवडून येतील, असेही ते म्हणाले. गेल्या पाच वर्षांत आम्ही जी विकासाची कामे केली ती पाहून आणि गेल्या तीन महिन्यातील केंद्र सरकारचा कारभार पाहता लोक या वेळी पुन्हा एकदा काँग्रेसलाच निवडून देतील. काँग्रेस व मित्रपक्षांना २००९ च्या लोकसभा निवडणुकीत ५६ टक्के जागा मिळाल्या होत्या. यूपीए सरकारने दिलेली धोरणे आपण इथे राबवली. ▸▸ पान ४ वर...

## आचारसंहितेचा लांबलेला मुहूर्त आघाडी सरकारच्या पथ्यावर

**मुंबई** : विधानसभा निवडणुकांच्या आचारसंहितेचा लांबलेला मुहूर्त आघाडी सरकारच्या पथ्यावरच पडणार आहे. गणपतीच्या आधी आचारसंहिता लागणार अशी चर्चा होती, मात्र आता गणेशोत्सव संपल्यानंतरही आचारसंहिता लागलेली नाही. विविध प्रशासकीय तसेच जनतेला खूश करणारे निर्णय घेण्यास त्यामुळे आघाडी सरकारला संधी मिळणार आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका ऑक्टोबरमध्ये होणार आहेत. निवडणुकांचा कार्यक्रम सर्वसाधारणपणे २७ दिवसांचा असतो. बहुतांश वेळा मतदानाच्या ४५ दिवस आधी आचारसंहिता लागते. ऐन गणेशोत्सवात आचारसंहिता नको अशी सर्वच प्रमुख पक्षांनी निवडणूक आयोगाकडे मागणी केली होती. मात्र आता गणेशोत्सव संपला तरी आचारसंहितेची घोषणा झालेली नाही. त्यामुळे जितके दिवस लांबतील तितका फायदा आघाडी सरकारला होणार आहे. कारण विविध प्रशासकीय तसेच जनतेला खूश करणारे निर्णय घेण्यासाठी सरकारला आणखी वेळ मिळणार आहे. आघाडी सरकार आता त्याचा फायदा कसा उचलते ते पाहावे लागणार आहे.

## पिंपरी परिसरात कायदा सुव्यवस्था धाब्यावर

- पिंपरी व आकुर्डीमध्ये गोळीबार
- दापोडीत तरुणाचा खून
- मोशीत गुंडाच्या आईवर हल्ला
- गुन्हेगारीने नागरिक धास्तावले



**पिंपरी** : खून, गोळीबार, खुनाचा प्रयत्न या घटनांनी बुधवारी पिंपरी चिंचवड परिसर हादरून गेला. पिंपरी आणि आकुर्डीत झालेल्या गोळीबाराच्या दोन घटनांमध्ये एक जण गंभीर जखमी झाला तर दापोडीत पोलिस चौकीच्या मागेच फ्रूट ज्यसूची गाडी लावण्याच्या कारणावरून एका तरुणाचा खून करण्यात आला. तर मोशी संजय गांधीनगर येथे सराईत गुन्हेगाराच्या आईवर तीक्ष्ण हत्याराने वार करून तिचा खून करण्याचा प्रयत्न करण्यात आला. लागोपाठ घडलेल्या या घटनांमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था धाब्यावर बसली असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. ( ▸▸ सविस्तर वृत्त पान ८ वर..)

## सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान केल्यास २० हजारांचा दंड?

**धूम्रपानविरोधी कठोर कायद्यासाठी सरकारच्या हालचाली**



**नवी दिल्ली** : सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास बंदी असल्याच्या कायद्याचे सर्रास होणारे उल्लंघन पाहता केंद्र सरकार याबाबत अधिक कठोर कायदा करण्याचा विचार करत आहे. त्यानुसार सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान केल्यास त्या व्यक्तीविरोधात दखलपात्र गुन्ह्याची नोंद करून त्याला तब्बल २० हजार रुपये दंड ठोठावण्यात येईल. तसेच सुट्या सिगारेटच्या विक्रीवरही बंदी लावण्याचा प्रस्ताव सरकारदरबारी विचाराधीन आहे.

धूम्रपान आणि तंबाखू सेवनाबाबत सध्या असलेले कायदे पुरेसे नसल्याचे मत व्यक्त होत असल्यामुळे या मुद्यावर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने एका समितीची नेमणूक केली होती. या समितीने आपल्या अहवालात ▸▸ पान ४ वर....

## पुणे मनपा हद्दीतील विकासप्रकल्पांना जिल्हाधिकाऱ्यांकडून परवानगी

**३४ गावांचा समावेश होईतोवर निर्णयांना मुख्यमंत्र्यांची मंजुरी**

**मुंबई** : पुणे महानगरपालिकेमध्ये ३४ गावे समाविष्ट करण्याबाबत नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या असून, याबाबत अंतिम निर्णय होईतोवर या गावातील विविध विकासकामांना जिल्हाधिकारी यांच्यामार्फत परवानगी देण्यास मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे संबंधित गावांतील अनेक रखडलेले प्रस्ताव मार्गी लागण्यास मदत होणार आहे.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीलगतची ३४ गावे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यासंदर्भात २९ मे २०१४ रोजी अधिसूचना काढून त्यावर नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या, ही प्रक्रिया अद्याप सुरू आहे. दरम्यानच्या ▸▸ पान ४ वर...

## प्रक्षोभक भाषण : अमित शहांविरोधात आरोपपत्र

**मुझफ्फरनगर** : लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान प्रक्षोभक भाषण केल्याप्रकरणी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांच्याविरोधात उत्तर प्रदेश पोलिसांनी तयार केलेले आरोपपत्र बुधवारी येथील स्थानिक न्यायालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी शहा दोषी ठरले तर त्यांना तीन वर्षांपर्यंतची शिक्षा होऊ शकते.



पोलिसांनी मुझफ्फरनगर येथे अमित शहा यांनी केलेल्या भाषणाच्या चित्रफितीच्या आधारावर हे आरोपपत्र तयार केले आहे. धर्म, जाती, समुदायाच्या आधारावर मत मागून समाजात तेढ निर्माण केल्याचा शहा यांच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने ४ एप्रिल २०१४ रोजी शहा यांना प्रक्षोभक भाषण प्रकरणी उत्तर प्रदेशात जाहीर सभा घेण्यास बंदी घातली होती. तसेच आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी शहा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे पोलिसांना आदेश ▸▸ पान ४ वर....

## आचारसंहितेपूर्वी मंत्रालयात लगबग

**बदल्यांसाठी अधिकाऱ्यांची धावपळ**

**सदानंद शिंदे**

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता कोणत्याही क्षणी लागू होण्याची शक्यता असल्याने आपली कामे करून घेण्यासाठी बडे बिल्डर्स, तर मोक्याच्या जागी पोस्टिंग मिळावी म्हणून अधिकारी यांची मंत्रालयातील वर्दळ बुधवारी कमालीची वाढलेली दिसत होती. तर अधिकाऱ्यांच्या बदल्यांची फाईल क्लीयर करण्यासाठी काही राज्यमंत्री आपल्या खात्याच्या कॅबिनेट मंत्र्यांच्या दालनात ठाण मांडून बसले होते. नगर विकास, महसूल, वित्त आदी महत्त्वाच्या खात्याच्या प्रधान सचिवांच्या दालनाबाहेर सुटाबुटातील बडे बिल्डर्स, त्यांचे लायझनिंग ऑफिसर आणि अनेक कंत्राटदार यांची संध्याकाळी उशिरापर्यंत लगबग सुरू होती. तर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली चांगल्या खात्यात, मोक्याच्या जागी ▸▸ पान ४ वर....

**वनजमिनींवरील घरे होणार हक्काची**

सर्वोच्च न्यायालयातील याचिका घेतली मागे

पान ४ वर

## रिपाइंला हव्यात दोनआकडी जागा

**मुंबई** : महायुतीचा घटक पक्ष म्हणून रिपाइंला किमान दोन आकडी संख्येत विधानसभेच्या जागा मिळायलाच हव्या. केवळ चार-पाच जागांवर बोळवण करणार असतील तर आम्हाला महायुतीत राहण्यात रस नाही, असा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष खासदार रामदास आठवले यांनी बुधवारी येथे दिला.



चेंबूर जिमखाना येथे आयोजित पत्रकार परिषदेत आठवले बोलत होते. बुधवारी आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची बैठक झाली, त्यात कार्यकर्त्यांनी विविध मते व्यक्त केली. परंतु अंतिम निर्णय मी घेणार आहे. काँग्रेस-राष्ट्रवादीला हरवण्यासाठी महायुतीला रिपाइंची गरज आहे. आम्हालाही महायुतीची गरज आहे. परंतु जागावाटपाचा निर्णय त्यांनी लवकर घ्यावा. आम्हाला दोन आकड्यांत जागा देऊन सन्मान राखावा, अशी मागणीही त्यांनी केली. आदिवासी पाडे-दलित वस्त्या राहायला हव्यात असे सांगून या वर्गात तसेच आता सर्वच घटकांत आमची ताकद वाढत असल्याचा दावाही त्यांनी केला. मुंबईत व अन्यत्र लोकसभा निवडणुकीत आमची मते महायुतीच्या उमेदवारांना मिळाली. परंतु साताऱ्यात त्यांनी आम्हाला मते दिली नाहीत, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. विधानपरिषदेच्या जागा, सत्तेत वाटा, एक राज्यपाल पद तसेच केंद्रात कॅबिनेट मंत्रीपद हवे, अशा आपल्या मागण्याही आठवले यांनी केल्या.

## आघाडी सरकारचे चुकीचे निर्णय रद्द करू : फडणवीस

**मुंबई** : काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारने गेल्या दीड आठवड्यात भ्रष्ट मार्गाने जे निर्णय घेतले असतील त्यांचे महायुतीचे सरकार आल्यानंतर पुनरावलोकन करण्यात येईल व ते रद्द करण्यात येतील, असे भाजपा प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी सांगितले. गेल्या काही दिवसांत आघाडी सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. त्यातील काही वादग्रस्तही आहेत. जनतेच्या भल्याचे निर्णय असल्यास हरकत नाही. मात्र स्वतःच्या फायद्याचे, बिल्डरांचे हित करणारे भ्रष्ट मार्गाने घेतलेले निर्णय आम्ही महायुतीचे सरकार आल्यानंतर तपासून पाहणार आहोत. गेल्या दीड महिन्यातील निर्णयांचे पुनरावलोकन करणार आहोत. जे निर्णय चुकीचे असतील, असे निर्णय रद्द करणार असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## काश्मिरात मदत, बचाव मोहीम युद्धपातळीवर

**अद्यापही लाखो लोक मदतीच्या प्रतीक्षेत**

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरमध्ये हाहाकार माजविणाऱ्या पुराची तीव्रता अखेर कमी झाली असली तरी पूरग्रस्तांच्या हालअपेष्टा कायम आहेत. एकीकडे सैन्यदलाची मदत आणि बचाव मोहीम युद्धपातळीवर सुरू आहे, तर दुसरीकडे वेळेवर मदत पोहोचविण्यात अपयशी ठरलेल्या ओमर सरकारविरोधात लोक नाराजी व्यक्त करत आहेत.

लष्कर, वायुदल, मरीन कमांडो आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचे जवान दिवस-रात्र बचाव कार्यात जुंपले आहेत. लोकांच्या सुरक्षेला आमचे प्राधान्य असून अखेरच्या नागरिकाची सुखरूप सुटका होईपर्यंत ही मोहीम थांबणार नसल्याचे लष्करप्रमुख दलबीरसिंह सुहाग यांनी स्पष्ट केले आहे. काश्मिरातील पूरपरिस्थिती आणि लष्कराच्या बचाव मोहिमेचा आढावा घेण्यासाठी सुहाग बुधवारी राज्यात दाखल झाले. आतापर्यंत ८० हजार नागरिकांना वाचविण्यात यश आले असले तरी अद्यापही हजारो नागरिक पुराने वेढलेल्या वस्त्यांमध्ये अडकले आहेत. हेलिकॉप्टरच्या मदतीने लोकांना वाचविण्यासोबतच रस्ते आणि दूरसंचार व्यवस्था पूर्ववत करण्याचे आव्हानही प्रशासनापुढे आहे. दरम्यान, जीवनावश्यक वस्तू घेऊन जाणाऱ्या लष्कराच्या दोन वाहनांना संतप्त स्थानिकांनी घेराव घालून अडविल्याची घटना श्रीनगरमध्ये घडली होती; परंतु अखेर तणाव निवळल्यानंतर ही वाहने सोडण्यात आली. ▸▸ पान ४ वर....

## पिंपरीत होणार जगातील पहिले होमिओपॅथी रुग्णालय

### कोणत्याही आजारावर होमिओपॅथी गुणकारी : डॉ. अमरसिंह निकम

**पुणे** : जगातील कोणत्याही नैसर्गिक आजारावर होमिओपॅथी हा रामबाण उपाय आहे. ताप, सर्दी, खोकल्यासारख्या आजारापासून हृदयविकार, किडनी व मेंदूचे आजार, कॅन्सर आणि एड्स अशा गंभीर आजारांवरही मात करणे होमिओपॅथीमुळे शक्य झाले आहे, असे प्रतिपादन होमिओपॅथीचे तज्ज्ञ डॉ. अमरसिंह निकम यांनी बुधवारी 'पुण्यनगरी'शी बोलताना व्यक्त केले. जगातील पहिले होमिओपॅथी रुग्णालय उभारण्याचा मान डॉ. निकम यांनी मिळविला असून येत्या दोन-तीन महिन्यांत हे रुग्णालय पिंपरी येथे सुरू होत आहे. या उपचारपद्धतीविषयी लोकांमध्ये विश्वास निर्माण करून अधिकाधिक प्रशिक्षित डॉक्टर तयार करण्याचा त्यांचा संकल्प आहे. ▸▸ पान ४ वर..




**ऑनलाइन पद्धतीने उपचार**

डॉ. निकम यांनी आपली वेबसाइट सुरू केली असून, ऑनलाइन पद्धतीने उपचार केले जातात. आपल्या www.drnikam.com या वेबसाइटद्वारे व्हीडीओ कॉन्फरन्स, फोनवरसुद्धा औषध देण्याची सोय करण्यात आली आहे.

## हिंगोलीत महिलेने दिला चार अपत्यांना जन्म!



**हिंगोली**: जुळे व तिळे जन्माला येण्याची घटना नेहमीच ऐकावयास मिळते. मात्र चार मुलांना जन्म दिल्याची घटना फारच दुर्मिळ असते. कळमनुरी तालुक्यातील कळमकोंडा येथील सुरेखा मदन बोक्से या मातेने १० सप्टेंबरच्या पहाटे १.३० वाजता हिंगोली शहरातील माधव मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये चार मुलांना जन्म दिला. दोन मुली व दोन मुले अशा चारही चिमुकल्यांसह आईची प्रकृती ठणठणीत आहे. डॉ. सचिन बगडिया व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. कंचन बगडिया यांनी ही यशस्वी प्रसूती केली आहे.

(सविस्तर वृत्त पान ४ वर...)